**<u>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग भूम (न्यायालय क्र.२)</u>**

नि.फौज.खटला क्र.७४/२०१४
शासन वि. शिवाजी
**निशानी क्र.१४६**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०६ चा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री.जे.जे.सरवदे यांचे मार्फत शपथेवर सुरु</u> –**

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | :– | औदुंबर बापुराव विभुते |
| माझे वय सुमारे | :– | ६८ वर्षे |
| माझा व्यवसाय | :– | सेवानिवृत्त |
| माझे राहण्याचे ठिकाण | :– | घाटंग्री, ता. जि.उस्मानाबाद |

**०१.** दिनांक ०२.०५.२०१३ रोजी मी जवळा आऊट पोस्टला हेड कॉ. म्हणून कार्यरत होतो. त्या दिवशी प्रशांत त्रींबक गोरे यांनी १४ आरोपींविरुध्द तक्रार दिली व ते निघून गेले. दिनांक ०२.०५.२०१३ रोजी ७.५० ते ८.३० पर्यंत मी घटनास्थळ पंचनामा केला. त्यावेळी माझ्यासोबत पंच किसन गोरे व शामराव गोरे हे दोघे होते. घटनास्थळावर दोन वीट व दोन लाकडी दांडके जप्त केले. त्यानंतर किसन गोरे, महादेव गोरे, हनुमंत खैरे, शामराव गोरे यांचे तपासटिपण घेतले. त्यानंतर आरोपी क्र.१ ते १३ यांना अटक केले. त्यानंतर त्यांना न्यायालयात हजर केले. त्यानंतर फिर्यादीचे व जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. आरोपींविरुध्द दोषारोप–पत्र न्यायालयात दाखल केले. आता मला निशानी १२९ वरील घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी, पंचाची व आरोपींची सही आहे. आता मला साक्षीदार महादेव गोरे यांच्या जबाबातील परिच्छेद अ मधील मजकुर वाचून दाखवण्यात आला. तो मजकुर मी त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदवला होता. त्यास **निशानी १४७** देण्यात येते. आता मला साक्षीदार शामराव गोरे यांच्या जबाबातील परिच्छेद अ मधील मजकुर वाचून दाखवण्यात आला. तो मजकुर मी त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदवला होता. त्यास **निशानी १४८** देण्यात येते. त्यापैकी काही आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहेत. आता मला आर्टीकल अ वरील जप्त मुद्देमाल वीटा व आर्टीकल ब वरील जप्त मुद्देमाल काठया दाखवण्यात आल्या. त्या त्याच आहेत.

**सरतपास पूर्ण.**

**<u>उलटतपास आरोपी तर्फे विधिज्ञ श्री. बी.बी.मुंडे</u> –**

**०२.** जवळा आऊटपोस्ट हे परंडा पोलीस स्टेशनच्या अंतर्गत आहे. हे म्हणणे खरे आहे की, जवळा आऊटपोस्ट येथील सर्व कारभार परंडा येथून चालतो. हे म्हणणे खरे नाही की, जवळा आऊटपोस्ट येथे फिर्याद नोंदवली जात नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रत्येक पोलीसाला आठवडयातून एक सुट्टी असते. हे म्हणणे खरे नाही की, सदरच्या दिवशी मी डयुटीवर नव्हतो. सदरच्या दिवशी प्रशांत व आरोपी दोघेही जवळा आऊटपोस्टला फिर्याद देण्याकरीता आले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी यांनी पहिल्यांदा फिर्याद दिली. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींनी फिर्याद दाखल केल्यानंतर मी सदरच्या फिर्यादीकडे चौकशीसाठी गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी चौकशीकरता गेल्यानंतर फिर्यादीने सांगीतले की, मलाही सदरच्या आरोपींविरुध्द फिर्याद दाखल करायची आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने त्यानंतर खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीच्या अनुशंगाने मी कोणतीही चौकशी व तपास केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आर्टीकल अ वरील वीटा साधारणतः कोठेही मिळतात. हे म्हणणे खरे नाही की, वीटा हया कोठूनतरी गोळा करुन दाखल केल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, काठया हया फिर्यादीने आणून दिल्या व मी त्या जमा केल्या. हे म्हणणे खरे नाही की, मी आऊटपोस्टला बसून खोटे दोषारोप–पत्र तयार केले व ते न्यायालयात दाखल केले. आरोपी क्र.१४ चे नाव चुकीचे होते त्यामुळे गावामध्ये त्याच्याबद्दल काही मिळून आले नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१४ विरुध्द फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २९९ प्रमाणे दोषारोप–पत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

MATE ASHLESHA SOUDAGAR
Digitally signed by MATE ASHLESHA SOUDAGAR
Date: 2025.08.05 11:38:11 +0530

दिनांक ०४.०८.२०२५

**( श्रीमती ए.एस.मते )**
न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, कोर्ट क्र.२, भूम.